# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in

महत्वाचे परिपत्रक

जा.क्र.१०/एनजीपी/फेरपरीक्षाप्रवेश/२०१८-१९/ १०८०
दिनांक : 30 AUG 2018

विषय- इयत्ता दहावीच्या फेरपरीक्षेच्या निकालानंतर पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे शै. वर्ष २०१८-१९ मध्ये प्रथम वर्ष पोस्ट एस. एस. सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरीता महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे संकेत स्थळावरील गुणपत्रिकेची प्रत ग्राह्य धरण्यास मान्यता देणेबाबत...

इयत्ता दहावीच्या फेरपरीक्षेचा निकाल महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी दि. २९.८.२०१८ रोजी जाहीर केलेला असुन इयत्ता दहावीच्या फेरपरीक्षेच्या निकालानंतर पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे शै. वर्ष २०१८-१९ च्या प्रथम वर्ष पोस्ट एस. एस. सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरीता महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संकेत स्थळावरील गुणपत्रिकेची प्रत ग्राहय धरण्यास मान्यता देण्याची विनंती संबधित विद्यार्थी/पालक/संस्था यांचेकडुन पत्रान्वये /दुरध्वनीव्दारे या संचालनालयास करण्यात आलेली आहे.

तरी सदरचे फेरपरीक्षेत उत्तिर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमधील प्रथम वर्ष पोस्ट एस. एस. सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना शै. वर्ष २०१८-१९ मधील पदविका अभ्यासक्रमाचे नियमावलीच्या अनुषंगाने खालील नमुद केलेल्या बाबी नुसार प्रथम वर्ष पोस्ट एस एस सी.पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये संस्था स्तरावर प्रवेश देण्यास संचालनालयाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रथम वर्ष पोस्ट एस. एस. सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचे प्रवेशाकरीता महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संकेत स्थळावरील गुणपत्रिकेची प्रत ग्राहय धरण्यासाठी संबधित FC/संस्था यांनी उमेदवाराने सादर केलेल्या निकालाच्या गुणपत्रिकेची शहानिशा महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संकेतस्थळावरुन करणे आवश्यक आहे.
२) संबधित प्रवेश देणा-या संस्थांनी उमेदवारांना प्रवेश देताना निकालाच्या गुणपत्रिकेची प्रत ग्राहय धरण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संकेत स्थळावरुन खात्री करुन घेणे आवश्यक आहे.
३) संबधित विद्यार्थ्याने महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे कार्यालयाकडून मुळ गुणपत्रिका प्राप्त होताच पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी प्रवेशित संस्थेस तात्काळ सादर करावी.
३) उमेदवाराने प्रवेशित संस्थेस मुळ गुणपत्रिका सादर न केल्यास अशा उमेदवारांचा संस्था स्तरावरील प्रवेश रद्द करण्यात येईल याची जाणीव संबधित उमेदवार /पालकांना असल्याबाबत लेखी अर्ज संबधितांनी प्रवेशित संस्थेकडे प्रवेशाच्या वेळी देणे आवश्यक राहील.

वरील नमुद प्रकरणी करण्यात आलेले संस्था स्तरावरील प्रवेश संबधित संस्थांनी संचालनालयाचे संकेतस्थळावर दि. ३१.८.२०१८ सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत Update करावेत.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृष्ठांकन क्र./तंशिस/विकाना/शैवि/पदविका/2018 /2885
दिनांक: 31 AUG 2018

प्रति,

प्राचार्य
प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी अभियांत्रिकी
पदविका संस्था नागपूर विभाग,
नागपूर

उपरोक्त पत्रात नमुद केल्याप्रमाणे नागपूर विभागातील संबंधीत संस्थानी कार्यवाही करण्यात यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर